सोमवार दि. ०८ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनेस्तहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यात मोठी राजकीय खळबळ!

# अपक्ष उमेदवाराच्या अर्जावर एम आय एम नगरसेविकेची सही; स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत नवा ट्विस्ट

### पक्षाचा अधिकृत उमेदवार मैदानात असतानाच नगरसेविकेचा अपक्षाला पाठिंबा; अर्ज मागे घेतल्यानंतरही राजकीय चर्चांना उधाण

**जालना | प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक मोठी आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेल्या सात नगरसेवकांपैकी एका नगरसेवकाने अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याच्या उमेदवारी अर्जावर सूचक म्हणून एमआयएम () पक्षाच्या एका विद्यमान नगरसेविकेची सही असल्याचे उघड झाल्यानंतर शहरातील राजकीय वातावरण तापले आहे.

विशेष म्हणजे या निवडणुकीत एमआयएम पक्षाचा अधिकृत उमेदवार मैदानात असतानाही पक्षातीलच नगरसेविकेने अपक्ष उमेदवाराच्या अर्जावर सूचक म्हणून सही केल्याने पक्षनिष्ठा, अंतर्गत राजकारण आणि भविष्यातील राजकीय समीकरणांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

**अर्जावरील सह्यांनी वाढवली उत्सुकता**

माहितीनुसार, अपक्ष उमेदवारी अर्जावर एकूण दहा नगरसेवकांच्या सह्या करण्यात आल्या होत्या. यामध्ये काँग्रेसमधून निलंबित अथवा हकालपट्टी झालेल्या काही नगरसेवकांसह एमआयएमच्या एका नगरसेविकेची सही आढळून आली. या घटनेनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना वेग आला असून, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते या घडामोडींचा अर्थ शोधण्यात व्यस्त आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक ही संख्याबळ आणि राजकीय संबंधांची कसोटी मानली जाते. त्यामुळे एखाद्या पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरोधात त्याच पक्षातील लोकप्रतिनिधीने अप्रत्यक्ष पाठिंबा दिल्याचे चित्र समोर येणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.

**एमआयएमच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

या प्रकरणातील सर्वात चर्चेचा मुद्दा म्हणजे एमआयएम नगरसेविकेची भूमिका. गेल्या काही महिन्यांपूर्वीच नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या या नगरसेविकेने पक्षाच्या अधिकृत भूमिकेपेक्षा वेगळी भूमिका घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. एमआयएमचा अधिकृत उमेदवार निवडणुकीच्या मैदानात असताना अपक्ष उमेदवाराला सूचक म्हणून समर्थन देणे हा केवळ वैयक्तिक निर्णय होता की त्यामागे काही वेगळे राजकीय गणित आहे, याबाबतही तर्कवितर्क लावले जात आहेत.

**भाजप आणि एमआयएमच्या कथित समीकरणांवर चर्चा**

या घटनेनंतर विरोधकांकडून भाजप आणि एमआयएम यांच्यातील कथित राजकीय समीकरणांबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. काही राजकीय निरीक्षकांच्या मते, स्थानिक पातळीवरील निवडणुकांमध्ये अनेकदा पक्षीय सीमा ओलांडून वैयक्तिक आणि गटाधारित समीकरणे तयार होत असतात. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ एका सहीच्या घटनेपेक्षा व्यापक राजकीय संदर्भातून पाहिले जात आहे. तथापि, यासंदर्भात कोणत्याही पक्षाकडून अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नसल्याने चर्चांना अधिकच खतपाणी मिळत आहे.

**कैलास गोरंट्याल यांच्या हस्तक्षेपानंतर नाट्यमय घडामोड**

या संपूर्ण प्रकरणाला आणखी नाट्यमय वळण तेव्हा मिळाले, जेव्हा अपक्ष उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतला. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपचे वरिष्ठ नेते कैलास गोरंट्याल यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर संबंधित उमेदवाराने निवडणुकीतून माघार घेतली. अर्ज मागे घेतल्यामुळे संभाव्य राजकीय संघर्ष टळला असला, तरी अर्जावर झालेल्या सह्या आणि त्यातून समोर आलेल्या राजकीय संदेशामुळे या प्रकरणाची चर्चा अजूनही कायम आहे.

**एमआयएमकडून कारवाई होणार का?**

आता सर्वांचे लक्ष एमआयएम पक्षाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात गेल्याचा आरोप होत असलेल्या नगरसेविकेविरुद्ध पक्षांतर्गत चौकशी किंवा शिस्तभंगाची कारवाई केली जाणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. पक्ष नेतृत्व या घटनेकडे किती गांभीर्याने पाहते आणि भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी कोणती भूमिका घेते, हे आगामी काही दिवसांत स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

**स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा**

या घटनेमुळे जालना शहरातील स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षांतील अंतर्गत गटबाजी, असंतोष आणि राजकीय पुनर्रचनेचे संकेत या घटनेतून मिळत असल्याचे जाणकारांचे मत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतील ही एक सही सध्या जालना जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली असून, येत्या काळात या घटनेचे पडसाद आणखी उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जिल्ह्यासाठी हवामान सतर्कतेचा इशारा; यलो अलर्ट

### वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि पावसाची शक्यता; नागरिक व शेतकऱ्यांनी सावध राहण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना | प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात पुढील चार दिवस वातावरणात लक्षणीय बदल होण्याची शक्यता असून, प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा (मुंबई) यांनी जिल्ह्यासाठी हवामान सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. हवामान विभागाने ७ आणि ८ जून रोजी जालना जिल्ह्यासाठी यलो अलर्ट घोषित केला असून, विजांच्या कडकडाटासह वादळी वारे, हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. अचानक बदलणाऱ्या हवामानामुळे जीवित व वित्तहानी होऊ नये यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

**७ व ८ जूनला यलो अलर्ट**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार ७ आणि ८ जून रोजी जिल्ह्यातील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. विजांच्या कडकडाटासह वादळी वारे वाहू शकतात. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक बाहेर पडणे टाळावे तसेच सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा.

**९ व १० जूनलाही पावसाची शक्यता**

९ जून रोजी जिल्ह्यात मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर १० जून रोजी काही भागांत हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे पुढील चार दिवस हवामान अस्थिर राहण्याची शक्यता आहे.

**शेतकऱ्यांसाठी विशेष सूचना**

अवकाळी पाऊस आणि संभाव्य वादळी वातावरणामुळे शेतीपिकांचे नुकसान होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी पीक संरक्षणाची उपाययोजना करावी. काढणी केलेला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समित्यांमध्ये विक्रीसाठी आणलेला माल पावसापासून सुरक्षित राहील याची खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने म्हटले आहे.

तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करून त्यांचे संरक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**विजेच्या कडकडाटादरम्यान घ्यावयाची काळजी**

वादळी वातावरण आणि मेघगर्जनेच्या वेळी झाडाखाली किंवा उघड्या मैदानात उभे राहू नये. टॉवर, ध्वजस्तंभ, विद्युत खांब, ट्रान्सफॉर्मर, धातूचे कुंपण आणि विद्युत वाहिन्यांपासून सुरक्षित अंतर राखावे.

वीजा चमकत असताना मोबाइल चार्जिंगसह कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. ट्रॅक्टर, मोटारसायकल, सायकल तसेच इतर धातूच्या वस्तूंपासून दूर राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

मोकळ्या *(पान २ वर)*

**नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना**

- विजांचा कडकडाट सुरू असताना घराबाहेर पडू नका.
- झाडाखाली, विद्युत खांबाजवळ किंवा टॉवरजवळ उभे राहू नका.
- विद्युत उपकरणांचा वापर टाळा.
- शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवा.
- जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलवा.
- धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नका.
- आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाशी संपर्क साधा.

# कालिका स्टीलचे संचालक घनश्यामदास गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड

### सामाजिक, धार्मिक व औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल; विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

**जालना | प्रतिनिधी**



जालना येथील प्रसिद्ध उद्योगपती, समाजसेवक आणि धर्मप्रेमी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या कालिका स्टीलचे संचालक घनश्यामदासजी गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनच्या यावर्षी गठित करण्यात आलेल्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये देशभरातील विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या आणि समाजहितासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय अध्यक्ष बसंत मित्तल आणि राष्ट्रीय महामंत्री गोपाल गोयल यांच्या हस्ते घनश्यामदासजी गोयल यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. घनश्यामदासजी गोयल हे उद्योग क्षेत्रातील यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जात असतानाच समाजसेवा आणि धार्मिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. विविध सामाजिक उपक्रम, शैक्षणिक मदत, गरजू घटकांना सहकार्य, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच समाजातील एकात्मता आणि विकासासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवून *(पान २ वर)*

# नवा नाही, जुन्याच निर्णयांचे आकर्षक पॅकेजिंग मराठवाड्यातील मराठा समाजाची फसवणूक

### ना. राधाकृष्ण विखे पाटील व आ. प्रसाद लाड यांच्यावर डॉ. संजय लाखे पाटील यांचा घणाघाती आरोप

### हैदराबाद गॅझेट आरक्षणाच्या मूळ मागणीला पुन्हा बगल न्यायालयीन, कायदेशीर आंदोलन अधिक तिव्र करण्याचा इशारा

**जालना -प्रतिनिधी**

मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांनी नुकतेच जाहीर केलेले निर्णय हे नवे नसून पूर्वीच अस्तित्वात असलेल्या शासन आदेशांचे आणि कार्यपद्धतीचे () केवळ नव्या स्वरूपात सादरीकरण असल्याचा गंभीर आरोप मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाजाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना डॉ. लाखेपाटील म्हणाले की, दि. ५ जून २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेला शासन आदेश आणि हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र देण्याची जाहीर करण्यात आलेली कार्यपद्धती () ही प्रत्यक्षात नवीन नसून यापूर्वीच



अस्तित्वात असलेली व्यवस्था आहे. मात्र या निर्णयांना ऐतिहासिक स्वरूप देत मोठा गाजावाजा करण्यात आला आणि विशेषतः मराठवाड्यातील मराठा समाजाला काहीतरी नवीन दिल्याचा आभास निर्माण करण्यात आला. त्यांच्या म्हणण्यानुसार, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने दि. २४ जानेवारी २०२४ रोजी काढलेल्या शासन आदेशानुसार मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागास प्रवर्गाप्रमाणे शैक्षणिक सवलती आणि विविध लाभ देण्याचा निर्णय घेतला होता. त्याच आदेशाची पुनरावृत्ती आता नव्या शासन आदेशाच्या माध्यमातून करण्यात आली असून त्यात कोणताही मूलभूत बदल करण्यात आलेला नाही. डॉ. लाखेपाटील यांनी आरोप केला की, जुन्याच निर्णयांचे नव्या फॉन्टमध्ये टंकलेखन करून आणि आकर्षक सादरीकरणातून त्याचा प्रचार करण्यात आला. यामागे वास्तविक प्रश्न सोडवण्यापेक्षा राजकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न दिसून येतो. मराठवाड्यातील मराठा समाजाच्या भावनांशी खेळत ऐतिहासिक निर्णय म्हणून याचे सादरीकरण *(पान २ वर)*

# परतूरला मृत्यूनंतरही यातना थांबेनात ! कचऱ्याच्या गाडीतून नेला मृतदेह

**परतूर - प्रतिनिधी**



एक नव्हे तर दोन रुग्णवाहिका उपलब्ध असताना बेपत्ता झालेल्या युवकाचा सापडलेला मृतदेह चक्क कचऱ्याच्या गाडीतून वाहून नेल्याने शहरात नगरपालिका आणि पोलिसांच्या या अमानवीय कृत्याबद्दल संतापाची लाट उसळली आहे.नागरी सुविधा देण्यात असमर्थ ठरलेल्या येथील नगरपालिकेच्या निष्क्रियतेच्या झळा आता मृत्यूनंतर थांबत नसल्याचे चित्र या घटनेवरून स्पष्ट झाले आहे.राज्य सरकार एकिकडे रुग्णांना पुरेशा आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील असताना दुसरीकडे परतूर शहरात. मात्र यापेक्षा वेगळे चित्र आहे. दरम्यान,या गंभीर प्रकारची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी केली आहे.

परतूर शहरातील हिरालालनगरात सुरेश ढाकरगे या बेपत्ता झालेल्या युवकाचा मृतदेह आढळला. काटेरी झाडावझुडुपाट पाण्याच्या टाकीखाली आढळून आलेल्या या मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात नेताना पोलिसांना अनंत अडचणींचा सामना करावा लागला. पाण्याच्या टाकीपर्यंत जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नाही. हा संपूर्ण भाग काटेरी झाडाझुडुपांनी वेढलेला आहे. त्यातच मृतदेह वाहून नेण्यासाठी वेळेवर रुग्णवाहीका उपलब्ध झाली नाही. त्यामुळे मृतदेह न्यावा कसा असा प्रश्न उपस्थित झाला. त्यामुळे चक्क नगरपालिकेची कचरा वाहून नेणारी गाडी बोलावण्यात आली. आणि या कचरा गाडीतून मृतदेह नेण्यात आला.घरातील युवकाच्या मृत्यूमुळे अगोदरच दुःखात सापडलेल्या ढाकरगे परिवाराच्या दुःखात मृतदेह चक्क कचऱ्याच्या गाडीतून नेल्याने अधिकच भर पडली असेल यात शंकाच नाही.

परतूर नगरपालिकेकडे दोन रुग्णवाहीका उपलब्ध असल्याचे सांगण्यात येते. परंतु या रुग्णवाहीका वेळेवर का उपलब्ध होऊ शकल्या नाही हा खरा प्रश्न आहे. नगरपालिका प्रशासनाला या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. खरं तर शहरातील नागरिकांना चांगले रस्ते,शुद्ध पिण्याचे पाणी, पथदिवे या व इतर सुविधा देण्यासाठी नगरपालिका नावाची स्थानिक स्वराज संस्था अस्तित्वात असते.नागरिकांच्या सेवेसाठी निवडून आलेले नगराध्यक्ष तसेच विविध प्रभागातील नगरसेवक असतात.ही यंत्रणा परतूर शहरात देखील अस्तित्वात आहे. मात्र येथील नागरिकांना पुरेशा नागरी सुविधा मिळत नाहीत ही वस्तुस्थिती *(पान २ वर)*

### टाऊन हॉल परिसरातील उघड्या नाल्यांचे ढापे ठरतातय अपघाताचे निमंत्रण

# महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक संतप्त; पावसाळ्यापूर्वी तातडीने उपाययोजनांची मागणी

**जालना | प्रतिनिधी**



जालना शहराच्या मध्यवर्ती भागातील टाऊन हॉल परिसरात नाल्यांवरील काँक्रीट ढापे गायब झाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मागील अनेक महिन्यांपासून उघड्या अवस्थेत असलेल्या नाल्यांकडे जालना महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला असून प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. रविवारी (दि. ७) दुपारी १२ वाजेच्या सुमारास मिळालेल्या माहितीनुसार, टाऊन हॉल परिसरातील अनेक ठिकाणी नाल्यांवरील काँक्रीट ढापे तुटलेले अथवा पूर्णपणे गायब झालेले आहेत. त्यामुळे पादचारी, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी तसेच दुचाकीस्वारांसाठी हा परिसर धोकादायक बनला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाशामुळे उघडे नाले दिसत नसल्याने अपघात होण्याची शक्यता अधिक बळावली आहे.

नाल्यांवरील संरक्षणात्मक ढापे नसल्यामुळे प्लास्टिक पिशव्या, कागद, थर्माकोल, बाटल्या आणि इतर घनकचरा थेट नाल्यांमध्ये *(पान २ वर)*

# संपादकीय...

## पत्रकार संरक्षण कायदा 'फॅड' नाही; तो लोकशाहीच्या संरक्षणाची ढाल आहे!

जालना जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांत घडलेल्या घटनांनी पत्रकारितेच्या स्वातंत्र्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. एका बाजूला पत्रकारांवर जीवघेणे हल्ले होत आहेत, तर दुसऱ्या बाजूला त्या घटनांचा तपास करणाऱ्या यंत्रणांबाबतच पत्रकारांमध्ये अविश्वास वाढत आहे. संतोष भुतेकर, राहुल मुळे आणि इतर पत्रकारांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पत्रकारांनी घेतलेली आक्रमक भूमिका ही केवळ व्यक्तीगत संतापाची प्रतिक्रिया नसून लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाच्या अस्तित्वासाठी सुरू झालेला संघर्ष आहे.

पत्रकार हा केवळ बातमी देणारा व्यक्ती नसतो. तो समाजातील अन्याय, भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि सत्तेच्या गैरवापरावर प्रकाश टाकणारा प्रहरी असतो. त्यामुळे पत्रकारांवर होणारा प्रत्येक हल्ला हा एका व्यक्तीवर नव्हे, तर लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांवर झालेला हल्ला मानला जातो.

विशेष चिंतेची बाब म्हणजे महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असतानाही पत्रकारांवर सातत्याने हल्ले होत आहेत. त्याहून गंभीर म्हणजे या कायद्याकडे काही अधिकारी गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप पत्रकारांकडून केला जात आहे. जर एखादा अधिकारी पत्रकार संरक्षण कायद्यालाच ''फॅड'' समजत असेल, तर त्या अधिकाऱ्याच्या मनात पत्रकारांविषयी असलेला दृष्टिकोन आणि संवेदनशीलता याबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

कायद्याचे पालन करवून घेण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्यांच्याकडूनच कायद्याची खिल्ली उडवली जात असेल, तर सामान्य नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कसा टिकणार? पत्रकार संरक्षण कायदा हा कोणत्याही व्यक्ती किंवा संघटनेच्या दबावासाठी तयार झालेला कायदा नाही. तो पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी राज्याने केलेली वैधानिक व्यवस्था आहे.

जालना जिल्ह्यात गेल्या तीन महिन्यांत पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले आहेत. या प्रकरणांचा तपास उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आला आहे. मात्र, जर तपास अधिकाऱ्यांबाबतच पत्रकारांमध्ये अविश्वास निर्माण झाला असेल, तर निष्पक्ष तपासाची अपेक्षा कशी केली जाऊ शकते? न्याय केवळ झाला पाहिजे असे नाही, तर तो होत असल्याचे दिसलेही पाहिजे. त्यामुळे या प्रकरणांचा तपास इतर वरिष्ठ आणि निष्पक्ष अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्याची मागणी अवास्तव म्हणता येणार नाही. यापूर्वी एका उपोषणकर्त्याला लाथ मारल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यावर टीका झाली होती. त्या घटनेमुळे जनमानसात निर्माण झालेली प्रतिमा आणि आज पत्रकारांनी व्यक्त केलेला अविश्वास याकडे पोलीस प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कोणत्याही अधिकाऱ्याच्या वैयक्तिक प्रतिमेमुळे संपूर्ण तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये, ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

चंदनझिरा पोलीस ठाण्याबाबत पत्रकारांनी केलेले आरोप देखील दुर्लक्ष करण्यासारखे नाहीत. पत्रकारांनी दिलेल्या माहितीच्या आधारे अवैध धंद्यांवर कारवाई करण्याऐवजी जर माहिती देणाऱ्यालाच त्रास दिला जात असेल, तर भविष्यात कोणताही नागरिक किंवा पत्रकार पोलिसांना सहकार्य करण्यास धजावणार नाही. यामुळे गुन्हेगारीला अप्रत्यक्षपणे खतपाणी मिळण्याचा धोका आहे. या संपूर्ण प्रकरणातून एक गोष्ट स्पष्ट होतेपत्रकार आणि पोलीस हे लोकशाही व्यवस्थेतील परस्परपूरक घटक आहेत. पत्रकारांनी जबाबदारीने वृत्तांकन करणे जितके आवश्यक आहे, तितकेच पोलिसांनी पत्रकारांच्या सुरक्षिततेबाबत संवेदनशील असणे आवश्यक आहे. संघर्षाची परिस्थिती निर्माण होणे ही दोन्ही संस्थांसाठी हितावह नाही. जालना जिल्ह्यात स्थापन होत असलेली पत्रकार कृती समिती हा केवळ निषेधाचा मंच नसून पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणारे व्यासपीठ ठरू शकते. मात्र हा संघर्ष वैयक्तिक द्वेषाचा नसून न्याय, पारदर्शकता आणि पत्रकारितेच्या स्वातंत्र्यासाठी असला पाहिजे. लेखणीची ताकद ही सूडासाठी नव्हे, तर सत्य आणि लोकहितासाठी वापरली गेली पाहिजे.

आज गरज आहे ती संघर्षापेक्षा संवादाची, अविश्वासापेक्षा पारदर्शकतेची आणि दबावापेक्षा कायद्याच्या राज्याची. पत्रकार संरक्षण कायदा हा ''फॅड'' नसून लोकशाहीच्या संरक्षणाची ढाल आहे. त्या ढालीवर प्रहार करणाऱ्यांना कायद्याची जाणीव करून देणे आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेची हमी देणे ही आता शासन आणि पोलीस प्रशासनाची नैतिक तसेच कायदेशीर जबाबदारी आहे.

## वाचकांचे मनोगत करिता

**मागील काही वर्षांपूर्वी अहमदनगर जिल्ह्यातील महिलांनी दारूच्या हातभट्टी बंद करण्याची मागणी केली होती.तसा,उठाव झाला होता.परंतु, सरकारने महिलांनी केलेल्या दारु बंदीच्या मागणीकडे दुर्लक्ष केले.एका दारूच्या बाटलीवर सतरा जन अवलंबून आहेत असे निष्कर्ष निघाले.विषारी दारुच्या दुर्घटना घटना राज्यात कुठे ना कुठे घडत असतात.अशीच घटना पुणे जिल्ह्यातील हडपसर आणि दापोडी विभागात मागील आठवड्यात विषारी दारूच्या सेवनाने वीस एक जणांचे बळी गेले.कष्टकरी मजूर श्रमपरिहार म्हणून दारु पितो तो मरण्यासाठी नक्कीच नाही.ज्यांच्या हातभट्टी आहेत त्यांनी वापरलेल्या रसायनांचा दुष्परिणाम झाला आणि नाहक बळी गेले.हातभट्टीवाला आपला काळा धंदा गोरा करण्यासाठी यंत्रणेतील संबंधितांना हातमिळवणी करून करतो हे सर्वश्रुत आहे.मग,या दुर्घटना कमी कशा होणार ? सरकारने तातडीने मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत, नोकरीचे आश्वासन देत वेळ मारुन नेली.राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या अखत्यारीत दारु संदर्भातील बाब आहे.पोलीस दलातील अधिकारी यांनी अशा दूर्घटना पुन्हा पुन्हा घडणार नाहीत याची दक्षता घ्यावी.ज्यांच्या घरातील कर्ता पुरुष गेला असेल ते कुटुंब कोणाच्या आधाराने जगणार हा प्रश्न पडतो आहे.**

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**
**mahadeogolvaskar@gmail.com**

# पान १ व ४ वरुन....

### जिल्ह्यासाठी...

जागेत अडकल्यास जमिनीशी कमीतकमी संपर्क ठेवून गुडघ्यावर बसावे, कान झाकावेत आणि डोके खाली घ्यावे, अशी सूचना आपत्ती व्यवस्थापन विभागाने केली आहे.

धोकादायक ठिकाणी सेल्फी टाळा

पावसाळी आणि वादळी वातावरणात नदी, नाले, धरण परिसर किंवा इतर धोकादायक ठिकाणी जाऊन सेल्फी काढणे टाळावे. अनेकदा अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे दुर्घटना घडत असल्याने नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**आपत्कालीन परिस्थितीत नियंत्रण कक्षाशी संपर्क**

आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित तहसील कार्यालय किंवा नजीकच्या पोलीस ठाण्याशी तात्काळ संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा प्रशासनाने सर्व नागरिकांना हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून स्वतःचे, कुटुंबाचे आणि जनावरांचे संरक्षण करण्याचे आवाहन केले आहे. पुढील काही दिवस जिल्ह्यात अस्थिर हवामान राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

**''यलो अलर्ट म्हणजे काय?''**

हवामान विभागाकडून जारी करण्यात येणारा यलो अलर्ट हा संभाव्य धोक्याचा इशारा मानला जातो. या अलर्टमध्ये हवामानातील प्रतिकूल बदलांमुळे काही प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक खबरदारी घेणे अपेक्षित असते.

### कालिका स्टीलचे...

आणण्यास मदत झाली असून अनेक युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील विकासाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनने त्यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीमुळे जालना जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अग्रवाल समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

घनश्यामदासजी गोयल यांच्या निवडीबद्दल विविध सामाजिक संस्था, व्यापारी संघटना, धार्मिक मंडळे, मित्रपरिवार तसेच अग्रवाल समाजाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. आगामी काळात राष्ट्रीय स्तरावर समाजाच्या विकासासाठी आणि संघटनेच्या बळकटीसाठी ते प्रभावी नेतृत्व करतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी अनेक मान्यवरांनी शुभेच्छा देताना घनश्यामदासजी गोयल यांचे नेतृत्व, संघटन कौशल्य आणि समाजहिताची भूमिका ही अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनच्या कार्याला नवी दिशा देणारी ठरेल, असा आशावाद व्यक्त केला.

अखिल भारतीय अग्रवाल सम्मेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड ''ही जबाबदारी समाजसेवेची नवी संधी'' असल्याची प्रतिक्रिया श्री गोयल यांनी दिली आहे. संघटनेने दाखविलेल्या विश्वासाबद्दल ही त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली असून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

### नवा नाही...

करण्यात आले, असा त्यांचा दावा आहे. हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वितरणासाठी नुकतीच जाहीर करण्यात आलेली कार्यपद्धतीही पूर्वीचीच असल्याचा आरोप त्यांनी केला. विभागीय महसूल आयुक्तांनी जाहीर केलेली ही यापूर्वी अस्तित्वात असलेल्या प्रक्रियेचीच पुनरावृत्ती असल्याचे ते म्हणाले. १९६७ पूर्वीच्या वडिलोपार्जित रक्तसंबंधांमधून कुणबी असल्याचे महसुली किंवा अन्य वैध पुरावे सादर केल्याशिवाय प्रमाणपत्र मिळू शकत नाही, ही अट कायम ठेवण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. लाखेपाटील यांच्या मते, मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणावरील मराठा कुटुंबांकडे अशा प्रकारच्या वैयक्तिक नोंदी उपलब्ध नाहीत. त्यामुळे हैदराबाद गॅझेटचा लाभ समाजघटक म्हणून मराठा समाजाला मिळावा, या मूळ मागणीपासून सरकार दूर जात असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांनी पुढे म्हटले की, सरकारने पुन्हा एकदा ओबीसीप्रमाणे पण ओबीसी नाही असा स्वतंत्र प्रवर्ग उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रवर्ग न्यायालयीन कसोटीवर टिकण्याबाबतही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हैदराबाद गॅझेटनुसार थेट ओबीसी मान्यता आणि त्याअनुषंगाने आरक्षण ही मराठा समाजाची मूलभूत मागणी असताना सरकारने त्या प्रश्नाला बगल दिल्याचा आरोप त्यांनी केला. मराठवाड्यातील मराठा समाजाच्या दीर्घकालीन आंदोलनाला थोपवण्यासाठी आणि समाजामध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी ही संपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचा दावाही त्यांनी केला. जुन्या सवलती नव्याने जाहीर करून समाजाची दिशाभूल केली जात आहे. प्रत्यक्षात हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षणाच्या मूळ प्रश्नावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असे ते म्हणाले. सरकारच्या या भूमिकेमुळे मराठा समाजामध्ये असंतोष वाढत असून हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षणासाठी सुरू असलेला लढा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिला. मराठवाड्यातील सकल मराठा समाजाला न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील, अशी भूमिका त्यांनी यावेळी स्पष्ट केली. दरम्यान, डॉ. लाखेपाटील यांनी केलेल्या आरोपांवर संबंधित मंत्री, शासन किंवा अन्य संबंधित पक्षांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप प्राप्त झालेली नाही.

### परतूरला मृत्यूनंतरही...

आहे. शहरातील अनेक भागातील रस्ते खराब झाले आहेत. अनेक भागात पथदिव्यांअभावी अंधारच अंधार असतो. पाणीपुरवठा कायम विस्कळीत असतो. शहरात घाणीचे साम्राज्य असते. आठवडे बाजारात गैरसोयीचाच बाजार अधिक आहे. बसस्थानकासमोर तलावाच्या आकाराचा भला मोठा खड्डा आहे. त्याकडे सर्वांचे दुर्लक्ष आहे. नगरपालिकेत कोणाचेच कोणावर नियंत्रण नसल्याचे चित्र आहे. काही मोजके नगरसेवक नागरी सुविधा देण्यासाठी दक्ष असतात मात्र बहुतांश नगरसेवकांना नागरिकांच्या समस्येशी काहीही घेणेदेणे नाही असेच चित्र प्रकर्षाने दिसून येते.

राज्यात भाजप व महायुतीची सत्ता आहे. तालुक्याला भाजपचे आमदार आहेत. नगरपालिका भाजपच्या ताब्यात आहे. एवढे असून मृतदेह चक्क कचऱ्याच्या गाडीतून न्यावा लागतो हे मात्र अनाकलनीय आहे.

**पाडेवार यांचा पुढाकार...**

हा सर्व प्रकार पाहता सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी पुढाकार घेत या प्रकरणी आवाज उठविला. नगरपालिका आणि पोलिसांच्या निष्क्रियतेबद्दल त्यांनी खंत तर व्यक्त केलीच परंतु या निंदनीय प्रकाराची चौकशी करावी अशी मागणीही केली.

### महानगरपालिकेच्या...

जात आहे. त्यामुळे अंडरग्राउंड ड्रेनेज व्यवस्था वारंवार चोकअप होत असून सांडपाणी रस्त्यावर येण्याचे प्रकार वाढले आहेत. परिणामी परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, अनेकदा सफाई कर्मचारी नाले स्वच्छ करत असले तरी ढापे नसल्याने पुन्हा काही दिवसांतच कचरा नाल्यांमध्ये साचतो आणि समस्या पूर्ववत होते. त्यामुळे केवळ साफसफाई न करता कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सध्या पावसाळ्याची सुरुवात झाली असून आगामी काही दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. अशा परिस्थितीत नाल्यांमध्ये साचलेला कचरा आणि चोकअप झालेली ड्रेनेज व्यवस्था शहरासाठी मोठी समस्या ठरू शकते. पावसाचे पाणी आणि सांडपाणी एकत्रितपणे रस्त्यावर आल्यास नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागेल.

व्यापारी आणि स्थानिक रहिवाशांच्या मते, टाऊन हॉल परिसर हा शहरातील महत्त्वाचा व्यापारी आणि वर्दळीचा भाग आहे. येथे दररोज शेकडो नागरिकांची ये-जा असते. त्यामुळे उघड्या नाल्यांमुळे एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नाल्यांमध्ये साचलेले सांडपाणी आणि कचऱ्यामुळे डासांची उत्पत्ती वाढत असल्याचे चित्र परिसरात दिसून येत आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. शहर स्वच्छतेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असताना प्रत्यक्षात नागरिकांना अशा मूलभूत समस्यांना सामोरे जावे लागत असल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा संबंधित विभागाकडे तोंडी तक्रारी करण्यात आल्या. काही नागरिकांनी लोकप्रतिनिधी आणि महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचेही लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने समस्या कायम आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी नाराजी वाढत आहे.

तातडीने कार्यवाहीची मागणी

टाऊन हॉल परिसरातील सर्व उघड्या नाल्यांवर नवीन व मजबूत ढापे बसवावेत, नाल्यांची तातडीने साफसफाई करावी, चोकअप झालेली ड्रेनेज व्यवस्था सुरळीत करावी आणि भविष्यात अशा समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी नियमित देखभाल यंत्रणा उभारावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी जालना महानगरपालिकेकडे केली आहे.

**''उघडे नाले म्हणजे नागरिकांच्या जीवाशी खेळ''**

टाऊन हॉल परिसरातील उघड्या नाल्यांची समस्या ही केवळ स्वच्छतेची नसून नागरिकांच्या सुरक्षिततेशी आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर बाब आहे. पावसाळ्याच्या तोंडावरही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना असून महानगरपालिकेने तातडीने उपाययोजना करून संभाव्य अपघात आणि आरोग्यधोके टाळावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.

### ॲड. धन्नावत...

अलीकडेच मोतीबाग जवळील चौपाटी परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी मोठा निधी खर्च केला आहे. मात्र, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या या पुलाच्या संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीला प्राधान्य दिलेले नाही. प्रशासनाचा हा विरोधाभासी कारभार नागरिकांमध्ये संतापाचे आणि प्रश्नांचे वातावरण निर्माण करत आहे. सुशोभीकरणापेक्षा नागरिकांची सुरक्षितता अधिक महत्त्वाची नाही का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

ॲड. धन्नावत यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे नूतन वसाहत येथील पुलाचे काम सुरू झाले आहे. आता त्याच धर्तीवर, प्रशासनाने कोणताही अनुचित प्रकार घडण्याची वाट न पाहता मोतीबाग जवळील रेल्वे उड्डाणपुलाच्या संरक्षक भिंतीचे कामही तातडीने हाती घ्यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. प्रशासनाने केवळ दिखाव्याच्या कामांवर लक्ष केंद्रित न करता, नागरिकांच्या सुरक्षिततेशी थेट संबंधित असलेल्या पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहे.

### महिलांना आरक्षण...

महिला आरक्षण कायदा निर्मितीतील यश -अपयश'' या विषयावर कानडे यांनी दुसरे पुष्प गुंफले.अध्यक्षस्थानी उद्योजक नारायण दादा चाळगे हे होते.

सत्कारमूर्ती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.सुशील सुर्यवंशी, लातूरच्या जिल्हा परिषद सदस्या शितल खोमणे,व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर ,सचिव सुनंदा बनसोडे ,उपाध्यक्ष सुरेखा गाडेकर, कोषाध्यक्ष तुकाराम कोल्हे ,सहसचिव सरिता तरवटे,सौरभ भिसे,संतोष लव्हटे, शांतीलाल बनसोडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. माजी आ.लहुजी कानडे म्हणाले, सामाजिक उतरंड असलेल्या व्यवस्थेत विधवा स्त्रियांची संपत्ती जप्त केली जायची, त्यांना कुठला आधार नसायचा.धर्म-रुढीच्या परंपरेविरुध्द अहिल्यादेवी होळकर यांनी विधवा स्त्रियांना दत्तक घेण्याची योजना राबवून संपत्ती त्यांच्याकडेच राहील असा प्रथमच दंडक निर्माण केला. महेश्वर साडी उद्योगातून माळवा परगण्यातील हजारो स्त्रियांना रोजगार देऊन आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण केले.मुला- मुलींसाठी पहिली शाळा काढली इतिहासकार, अभ्यासकांनी याचे संशोधन करावे असे आवाहनही कानडे यांनी केले.स्वातंत्र्यानंतर संसदेतील संविधान सभेत १५ महिलांनी '' गुणवत्तेवर पुरुषांची बरोबरी करणार'' असे म्हणत महिला आरक्षणास विरोध केला.असे सांगून १९९४ साली स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३% राजकीय आरक्षण मिळाले.१९९६ ला लोकसभेत बिल मंजूर झाले नाही. अटल बिहारी वाजपेयी यांनी तीन वेळेस महिला आरक्षण विधेयक संसदेत मांडण्याचा प्रयत्न केला मात्र ओबीसी महिलांना स्वतंत्र आरक्षण यामुळे ते मंजूर झाले नाही.अशी सविस्तर माहिती त्यांनी दिली. आगामी काळात महिलांना आरक्षण देऊनच निवडणूका घ्याव्या लागतील,नसता हाहाकार माजेल.असे कानडे यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात नारायण दादा चाळगे यांनी अहिल्यादेवी होळकर या महाराष्ट्राचा अभिमान, हिंदुस्तानचा हुंकार ,लोकशाहीचा अभिमान असून त्यांच्या नावाने व्याख्यानमालेच्या माध्यमातून सुरू असलेले विचारांच गुराळ चालू राहिलं पाहिजे.असे त्यांनी सांगितले. कल्याण दळे म्हणाले ,बारा बलुतेदारांनी संत, शौर्याने गाजवलेली परंपरा महाराष्ट्राला दिली असून त्याचा स्वीकार करून लोभाऐवजी विचारांमागे लागले पाहिजे, अटी- शर्तींची कर्जमाफी, भीषण महागाई, नीट पेपरचा गोंधळ यामुळे समाज रसातळाला जाईल अशी भीती दळे यांनी व्यक्त केली. डॉ.सुशील सुर्यवंशी यांनी सुजान नागरिक घडावा यासाठी व्याख्यानमाला समितीचे सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद असून चांगली माणसे राजकारणात जात नाहीत, म्हणून वाईट माणसांच फावतय असे डॉ.सूर्यवंशी यांनी सांगितले. व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक कोषाध्यक्ष तुकाराम कोल्हे यांनी,सूत्रसंचालन राजीव हजारे यांनी केले. तर संतोष लवटे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने समारोप झाला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह महिला, युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### हैद्राबाद येथून...

राठोड यांनी सांगितले आहे.आपल्या तालुक्यातील शेतकरी समृद्ध झाला पाहिजे यासाठी ही माहिती ग्राउंड लेव्हल पर्यंत पोहोचण्यासाठी आपण काम करणार असल्याचे राठोड यांनी सांगितले.

या इन्स्टिट्यूट कडून रयत शेतकरी गटाच्या शेतकऱ्यांचा नॅशनल लेवलचे प्रशिक्षण प्रमाणपत्र प्लांट हेल्थ मॅनेजमेंट चे डायरेक्टर डॉ.ओ. पी. शर्मा, डॉ. सुधाकर, डेव्हलपमेंट फाउंडेशनचे नीरज सिंग,इतर आधीव्याख्याता यांच्या हस्ते प्रदान करून गौरवीण्यात आले.प्रशिक्षणार्था सोबत आत्मा गटाचे व्यवस्थापक दत्तराव सूर्यवंशी,धैर्यशील पाटील ई.कर्मचारी उपस्थित होते.शेतीसाठी उपयुक्त प्रशिक्षण पूर्ण केल्या नंतर जिल्ह्यात दाखल झाल्या वर रयत शेतकरी गटाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### मानवाधिकार...

न्यायालयांनी वेळोवेळी स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने राजीब कलिता विरुद्ध भारतीय संघ यांसारख्या प्रकरणांमध्ये स्वच्छतेचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग असल्याचे म्हटले आहे. त्याचप्रमाणे, मुंबई आणि मद्रास उच्च न्यायालयांनी देखील स्वच्छ आणि सुरक्षित शौचालये उपलब्ध असणे हा महिलांच्या मानवी प्रतिष्ठेसह जगण्याच्या अधिकाराचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे नमूद केले आहे. न्यायालयांच्या या स्पष्ट निर्देशांनंतरही जालना महानगरपालिका प्रशासनाकडून होणारे दुर्लक्ष हे केवळ बेजबाबदारपणाचेच नाही, तर नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उघड उल्लंघन आहे.

जालन्यातील सार्वजनिक शौचालयांची सध्याची स्थिती पाहता, मानवाधिकार आयोगाने पुन्हा एकदा हस्तक्षेप करून महापालिकेला जबाबदार धरणे आवश्यक आहे. केवळ शौचालये बांधून जबाबदारी संपत नाही, तर त्यांची नियमित देखभाल आणि स्वच्छता ही प्रशासनाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पे अँड युज सारख्या योजनांची अंमलबजावणी करणे, सामाजिक संस्थांना सहभागी करून घेणे आणि खासगी मालमत्तेवरील अतिक्रमणाचा प्रश्न सोडवणे, यावर तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा, ॲड. धन्नावत यांच्या लढ्यातून मिळालेली ही सुविधा नागरिकांसाठी आरोग्य नव्हे, तर रोगराई वाटत राहील.

### देऊळगाव राजा...

नीलगायींना पुन्हा त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे सोडण्यात आले. वनविभाग, देऊळगाव राजा आणि युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे दोन वन्यजीवांना नवजीवन मिळाले. वन्यजीव संरक्षणासाठी प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन केलेल्या कार्याचे हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

### विमा नाकारणे...

नोंदवताना पुरेशी काळजी घेतली नाही, असेही आयोगाने म्हटले. त्यानुसार, आयोगाने तक्रार अंशतः मान्य करत एचडीएफसी एर्गो कंपनीला वैद्यकीय खर्चापोटी ६ लाख रुपये ९% व्याजासह देण्याचे निर्देश दिले, तर कॉन्टिनेंटल रुग्णालयाला मानसिक त्रासाची भरपाई म्हणून १ लाख रुपये आणि खटल्याचा खर्च म्हणून २५,००० रुपये देण्याचे आदेश दिले.या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''ग्राहक आयोगाचा हा निर्णय विमाधारक आणि रुग्ण या दोघांच्याही हक्कांचे संरक्षण करणारा आहे. अनेकदा विमा कंपन्या छोट्या-छोट्या तांत्रिक बाबी पुढे करून किंवा रुग्णालयाच्या नोंदीतील किरकोळ चुकांचा आधार घेऊन कायदेशीर दावे फेटाळतात. त्याचबरोबर, रुग्णालयांनी देखील रुग्णांच्या वैद्यकीय नोंदी तयार करताना अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे, कारण त्यांच्या एका चुकीच्या उल्लेखाचा परिणाम रुग्णाच्या आर्थिक आणि मानसिक स्थितीवर होतो. हा निकाल दोन्ही क्षेत्रांसाठी एक कठोर संदेश आहे. मी सर्व नागरिकांना आवाहन करतो की, विमा पॉलिसी घेताना आणि रुग्णालयात दाखल होताना सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा आणि कोणत्याही चुकीच्या नोंदी किंवा अन्यायकारक वागणुकीविरोधात आवाज उठवण्यासाठी ग्राहक आयोगाचा दरवाजा ठोठावा.''

# मिरची व्यापारी शेख मोहसीन यांच्या हत्या प्रकरणी दोन आरोपी जेरबंद

## न्यायालयाकडून चार दिवसांची पोलीस कोठडी; हत्येमागील संपूर्ण कटाचा तपास वेगाने सुरू

**जाफराबाद । प्रतिनिधी**

जाफराबाद शहरासह संपूर्ण जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या मिरची व्यापारी शेख मोहसीन शेख मजीद (वय ४६) यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी जाफराबाद पोलिसांनी महत्त्वाची कारवाई करत दोन आरोपींना अटक केली आहे. दुचाकी चोरी करून पळ काढत असताना पाठलाग करणाऱ्या शेख मोहसीन यांच्यावर धारदार शस्त्रांनी वार करून त्यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपी महेश ज्ञानदेव सोनवणे (वय २५) आणि निलेश संजय पवार (वय २५, रा. सिंदखेडराजा) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जाफराबाद परिसरात दुचाकी चोरीच्या उद्देशाने आलेल्या आरोपींनी एका वाहनावर डल्ला मारला होता. चोरी करून पळून जात असताना मिरची व्यापारी शेख मोहसीन शेख मजीद यांनी संशयितांचा पाठलाग सुरू केला. पाठलागामुळे घाबरलेल्या आरोपींनी स्वतःचा बचाव करण्याऐवजी अत्यंत क्रूर मार्ग अवलंबत मोहसीन यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला चढवला. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मोहसीन यांना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र अतिरक्तस्राव आणि गंभीर जखमांमुळे त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर जाफराबाद शहरात संतापाची लाट उसळली होती. घटनेनंतर जाफराबाद पोलिसांनी विविध पथके तयार करून तपासाला गती दिली. घटनास्थळावरील पुरावे, तांत्रिक माहिती, सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा माग काढला. अखेर महेश सोनवणे आणि निलेश पवार या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत चोरीच्या घटनेदरम्यान पाठलाग झाल्यामुळे आरोपींनी संतापाच्या भरात आणि पकडले जाण्याच्या भीतीने हल्ला केल्याची माहिती समोर येत असल्याचे सूत्रांनी सांगितले. अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. तपासासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे सांगत पोलिसांनी कोठडीची मागणी केली. युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या काळात आरोपींकडून हत्येत वापरलेली शस्त्रे, चोरीच्या इतर घटनांमधील सहभाग, साथीदारांची माहिती आणि गुन्ह्याशी संबंधित इतर बाबींची चौकशी केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांना मदत करण्यासाठी पुढे सरसावलेल्या व्यापाऱ्याचा जीव जाण्याची घटना अत्यंत दुर्दैवी असल्याची भावना जाफराबाद परिसरात व्यक्त होत आहे. व्यापारी संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तपासाकडे सर्वांचे लक्ष या हत्येमागे केवळ दुचाकी चोरीचा प्रयत्न होता की आरोपींचा एखाद्या मोठ्या गुन्हेगारी टोळीशी संबंध आहे, याचा तपास सध्या पोलीस करीत आहेत.

## नागपूर येथे दि.११ जूनला श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण




**नागपूर - प्रतिनिधी**

दिनांक ११ जून २०२६ रोज गुरूवारला जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी परिवाराच्या वतीने जैन कलार समाज भवन, रेशिमबाग नागपूर येथे अधिक ज्येष्ठ मास/पुरुषोत्तम मासातील कमला एकादशी या अमृत पर्वाचे औचित्य साधून श्री गजानन विजय ग्रंथाचे २१ अध्यायाचे भव्य सामूहिक पारायण आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाची रूपरेषा याप्रमाणे १) पारायण:- संध्याकाळी ५.०० ते ५.३० - २१व्या अध्यायाचे.२)श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांचा हरिपाठ:- ५.४५ ते ६.३० पर्यंत,३) शेगाव प्रमाणे श्री संत गजानन महाराज यांची महा आरती:- ६.३० ते ७.०० पर्यंत आणि आरती नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.संपुर्ण गजानन भक्तांना विशेष सूचना:-शक्य असल्यास पुरूषांनी पांढरा पोशाख व पांढरी टोपी परिधान करून यावे,महिला भक्तांनी पिवळी साडी परिधान करून यावे.या कार्यक्रमाचा लाभ समाजबांधवांनी व संपूर्ण गजानन भक्तांनी अवश्य घ्यावा अशी जैन कलार समाज जेष्ठ नागरिक मंडळ व आपुलकी परिवाराच्या वतीने आग्रहाची विनंती. जय गजानन माऊली.

**रमेश लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# संशयित भेसळयुक्त आईस्क्रीमवर एफ डी ए चा मोठा छापा; १८७.६ किलो साठा जप्त

## राज महल आईस्क्रीमच्या गोडाऊनवर कारवाई; प्रयोगशाळा अहवालानंतर होणार कारवाई

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या हंगामात मोठ्या प्रमाणावर विक्री होणाऱ्या आईस्क्रीमच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारी कारवाई अन्न व औषध प्रशासनाने () छत्रपती संभाजीनगर येथे केली आहे. एमआयडीसी चिकलठाणा परिसरातील राज महल आईस्क्रीमच्या गोडाऊनवर छापा टाकून संशयित भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या आईस्क्रीमचा तब्बल १८७.६ किलो साठा जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या साठ्याची बाजारमूल्यानुसार किंमत ₹४३,१४८ इतकी असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. अन्न सुरक्षा अधिकारी फरीद सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमुळे शहरातील दुग्धजन्य पदार्थ व थंड खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**गोडाऊनवर अचानक धाड**

अन्न व औषध प्रशासनाला प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील राज महल आईस्क्रीमच्या गोडाऊनची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान काही उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्याने संबंधित साठा तात्काळ जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये शाही गुलाब फ्लेवरचे ९८.८ किलो आणि मँगो फ्लेवरचे ८८.८ किलो आईस्क्रीम आढळून आले. एकूण १८७.६ किलो आईस्क्रीमचा हा साठा संशयित भेसळयुक्त अथवा निकृष्ट दर्जाचा असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

**नमुने प्रयोगशाळेत पाठविले**

कारवाईनंतर जप्त करण्यात आलेल्या आईस्क्रीमचे अधिकृत नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. या नमुन्यांमध्ये अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाच्या () निकषांचे पालन झाले आहे का, वापरण्यात आलेले घटक सुरक्षित आहेत का, तसेच उत्पादनाचा दर्जा ग्राहकोपयोगी आहे का याची तपासणी केली जाणार आहे. प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधित उत्पादन भेसळयुक्त अथवा निकृष्ट दर्जाचे असल्याचे निश्चित होणार आहे. अहवालानुसार दोष आढळल्यास संबंधित गोदामाचे मालक नरेशकुमार जाट यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर**

आईस्क्रीम हे लहान मुले, युवक आणि नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर सेवन केले जाणारे खाद्यपदार्थ आहे. अशा परिस्थितीत भेसळयुक्त अथवा निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांमुळे अन्न विषबाधा, पचनसंस्थेचे विकार, ॲलर्जी आणि इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे अशा कारवाया ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

विशेषतः उन्हाळा आणि पावसाळ्याच्या कालावधीत दुग्धजन्य पदार्थांच्या साठवणुकीत निष्काळजीपणा झाल्यास त्याचा थेट परिणाम ग्राहकांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने अशा उत्पादन उत्पादक व विक्रेत्यांवर नियमित नजर ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे.

**एफ डी ए चा इशारा**

अन्न सुरक्षा विभागाने नागरिकांना दर्जाहीन अथवा संशयास्पद खाद्यपदार्थांची माहिती प्रशासनाला देण्याचे आवाहन केले आहे. तसेच उत्पादक आणि विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# पावसापूर्वी अवैध मुरूम-वाळू उत्खननाची मोजणी करा- आमदार बबनराव लोणीकर

## हेलसवाडीत परवानगीपेक्षा चौपट उत्खनन, सर्वेक्षणाची मागणी


**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध मुरूम व वाळू उत्खनन प्रकरणी आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हा प्रशासनाकडे पावसापूर्वी तातडीने मोजणी करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन झाल्याच्या तक्रारी आहेत. मात्र जिल्हा प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार पाऊस पडण्याची वाट पाहत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पाऊस सुरू झाल्यानंतर उत्खननाच्या खुणा नष्ट होण्याची शक्यता असल्याने प्रत्यक्षात किती मुरूम व वाळू काढण्यात आली याचे अचूक मूल्यांकन करणे कठीण होणार आहे. लोणीकर यांनी सांगितले की, मोजणीसाठी संबंधित एसएलआर अधिकाऱ्यांशी ५० पेक्षा अधिक वेळा संपर्क साधण्यात आला. मात्र जिल्हा प्रशासन किंवा कंत्राटदारांनी मोजणी शुल्क भरल्याशिवाय सर्वेक्षण करता येणार नसल्याचे उत्तर त्यांना देण्यात आले. त्यामुळे प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन आवश्यक शुल्काची तरतूद करावी आणि स्वतंत्र मोजणी प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा पुरावे नष्ट होण्याचा धोका वाढणार असल्याचे त्यांनी नमूद केले.पावसापूर्वी मोजणी न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. पावसामुळे उत्खनन क्षेत्रातील खड्डे भरून जातात, भूभागाची नैसर्गिक रचना बदलते आणि उत्खननाची वास्तविक खोली व व्याप्ती निश्चित करणे अवघड होते. परिणामी शासनाच्या महसुलाचे नेमके नुकसान किती झाले, परवानगीपेक्षा किती अधिक उत्खनन झाले आणि संबंधितांवर किती दंडात्मक कारवाई करावी, याचे अचूक निर्धारण करणे शक्य होत नाही. त्यामुळे पुरावे कमकुवत होण्याची शक्यता निर्माण होते. प्रशासनाने योग्य वेळेत मोजणी केली नाही तर प्रत्यक्षात किती चोरी झाली हे कधीच समोर येणार नाही, असा इशाराही लोणीकर यांनी दिला आहे. अशा परिस्थितीत कंत्राटदारांना संरक्षण मिळत आहे का, तसेच जिल्हा प्रशासनाची भूमिका संशयास्पद आहे का, असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पारदर्शकता राखण्यासाठी तातडीने स्वतंत्र आणि निष्पक्ष मोजणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, हेलसवाडी येथील प्रकरणाने या आरोपांना अधिक बळ मिळाले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने केवळ ८ हजार ब्रास मुरूम उत्खननाची परवानगी दिली असताना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या एटीएस मोजणीत प्रत्यक्षात ३२ हजार ४४० ब्रासपेक्षा अधिक मुरूम काढण्यात आल्याचे समोर आले आहे. म्हणजेच मंजूर मर्यादेपेक्षा तब्बल चारपट अधिक उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाले असून, हे १०० टक्के मुरूम चोरीचे उदाहरण असल्याचा दावा करण्यात येत आहे.

# राज्यातील अनेक शहरातील फुटपाथवर व्यावसायिकांनी अतिक्रमण करून,पादचाऱ्यांपुढे गंभीर समस्या निर्माण

राज्यासह देशात अतिक्रमण हटविण्याची मोहीम मोठ्या प्रमाणात सुरू याचे स्वागतच.परंतु मोठमोठ्या व्यावसायिकांनी (दुकानदार, खाजगी दवाखाने, कोचिंग क्लासेस,अवैध प्रवासी वाहतूक)इत्यादी अनेक क्षेत्रातील व्यावसायिकांनी फुटपाथवर अतिक्रमण करून आपली पकड मजबूत केल्याचे दिसून येते.सरकारने बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरातील अवैध वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला आहे ही अत्यंत चांगली गोष्ट आहे.परंतु बसस्थानकाच्या परिसरात अवैध प्रवासी वाहतूक का होते याचा विचार सरकारने कधी केला का? सरकारने टाईम-टू-टाईम बस सोंडने,प्रवाशांची गैरसोय दूर करणे, प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसेसची संख्या वाढविणे यावर जर सरकारने नियंत्रण ठेवले असते तर अवैध प्रवासी वाहतूक बसस्थानकाच्या परिसरात दिसलीच नसती व एसटी महामंडळ संकटात सापडले नसते.परंतु सरकारचे लक्ष प्रवाशांकडे नसल्याने ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.सरकार प्रवाशांना पाहिजे त्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देत नसल्याने अवैध प्रवासी वाहतूकीची परिस्थिती निर्माण झाली आहे.कारण राज्यातील अनेक भागात घंटोनघंटे बस वेळेवर पोहचत नाही यामुळे प्रवाशांची गैरसोय होते अशा परिस्थितीत प्रवासी खाजगी वाहतूकीकडे वळतांना दिसतात.त्यामुळेच आज एसटी महामंडळ संकटात सापडली आहे आणि त्याचे प्रायश्चित्त आज गोरगरीब,सर्वसामान्य व ग्रामीण प्रवाशांना भोगावे लागत आहेत याला एसटी महामंडळ व सरकार जबाबदार आहे.अशाचप्रकारे सरकारी आरोग्य सुविधा दिवसेंदिवस ढासळत असल्याने त्यांच्या आसपास खाजगी दवाखान्याचा भरमाड वाढला आहे अशा परिस्थितीत यांनी सुद्धा फुटपाथवर अतिक्रमण करून आपली पकड मजबूत करून पार्किंगसाठी वापर आहे आणि याचे प्रायश्चित्त सर्वसामान्यांना भोगावे लागत आहेत.त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत अवैध प्रवासी वाहतूकदारांनी सुध्दा फुटपाथवर आपली पकड मजबूत केल्याचे दिसून येते.आपण पहातो की,राज्यातील बहुतांश शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके,रेल्वे स्थानके, कोचिंग क्लासेस व दुकानदार यांच्याकडून फुटपाथवर अतिक्रमण करून दुरूपयोग करतांना दिसतात.याला जबाबदार स्थानिक प्रशासन व सरकार आहे आणि ह्या सर्व घटना सरकार, प्रशासन, स्थानिक प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहत आहे .फुटपाथ म्हणजे पादचाऱ्यांनी पायी चालण्याची जागा असते.परंतु सध्याच्या परिस्थितीत राज्यातील अनेक शहरांमध्ये जनुकाय व्यावसायिकांनी फुटपाथवर आपलीं मालकी केली की काय असे चित्र राज्यात सर्वत्रच दिसून येते. वाढते ट्राफीक,वाढती पार्किंगची समस्या आणि फुटपाथवर अवैध व्यवसाय यामुळे पायदळ चालणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते व याचा परिणाम दुर्घटनेमध्ये होतो हे आपण अनेकदा मिडियाच्या व वर्तमानपत्राच्या माध्यमातून पाहिले आहे.फुटपाथवरुन पादचारी चालु शकत नाही,कारण तिथे दुकाने लागली असतात, वाढत्या ट्राफीकमुळे रस्त्यांनी मोठी गर्दी असते या सर्व अडचणींमध्ये पायदळ चालणारे आबालवृद्ध, विद्यार्थी व सर्वसामान्य अडकतात अशा परिस्थितीत सर्वांनाच घरी जाण्याची घाई असते.अशा कठीण परिस्थितीत मोठ्या प्रमाणात दुर्घटना सुध्दा ओढावू शकते आणि दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत.अनेकदा पायदळ चालणाऱ्यांना मागून एखादे वाहन येते आणि दुर्घटना करून निघून जाते.यात दोषी कोण पायदळ चालणारे म्हणावे की वाहन चालविणारे! माझ्यामते यात मुख्य दोषी म्हणजे स्थानिक प्रशासन व सरकार आहे .कारण फुटपाथचा योग्य आणि सटीक उपयोग जर झाला तर आणि फुटपाथ पायदळ चालणाऱ्यांसाठी मोकळी केली तर पायदळ चालणाऱ्यांच्या ९५ टक्के दुर्घटना आपोआप थांबेल. प्रशासन वाहन चालकांचे लायसन्स किंवा हेल्मेट विचारतात मग पायदळ चालणाऱ्यांना फुटपाथवर चालण्याचे का सांगत नाही किंवा का विचारत नाही!कारण फुटपाथवर व्यावसायिकांनी पुर्णपणे अतिक्रमण केले असते.त्यामुळे सरकारने, प्रशासनाने व स्थानिक प्रशासन पायदळ चालणाऱ्यांच्या वाढत्या दुर्घटना पहाता संपूर्ण नागरिकांसाठी राज्यातील संपूर्ण शहरातील फुटपाथ मोकळी केली पाहिजे,असे माझे स्पष्ट मत आहे. मागील वर्षी एक भयावह आणि अंगावर शहारे येणारी घटना घडली. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी मार्गावरील काटली गावानजीक अल्पवयीन सहा मुले पहाटे ५.३० च्या दरम्यान मॉर्निंग वॉकला निघाली असता अचानक भरधाव मालवाहू ट्रकने ६ मुलांना चिरडले यात ४ मुलांचा वेदनादायक मृत्यू झाला व दोन गंभीर जखमी झाले होते.यावरून आपण समजू शकतो की पायदळ किंवा मॉर्निंग वॉक करने सुरक्षित नाही म्हणजेच घराच्या बाहेर निघतांना जीव मुठीत घेऊन निघावे लागते. फुटपाथवर चालनारा असो अथवा रोडच्या कडेला चालनारे असो यांना सुध्दा दुर्घटनेने सोडले नाही. त्यामुळे काही कारण नसताना दुर्घटना किंवा काही चूक नसतांना पायदळ चालणाऱ्यांच्या भयावह दुर्घटना होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.यावर सरकारने व स्थानिक प्रशासनाने ताबडतोब अंकुश लावने गरजेचे आहे.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# स्वागतार्ह आदेश

भारतीय प्रशासकीय सेवेतील धडाकेबाज अधिकारी तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी नियुक्त झाली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी सुप्त अवस्थेत असलेल्या नियमांची अतिशय कडक अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यांनी राज्यातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांना रस्त्यावरील वडापाव विक्रेते, भाजी विक्रेते, हॉटेल्स आणि मिठाई दुकानदारावर छापे टाकून वृत्तपत्राचा वापर थांबवण्याचे आदेश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत थेट गुन्हे दाखल करणे किंवा मोठ्या रकमेचा दंड ठोकण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत. मुंढे साहेबांच्या आदेशानंतर आणि मुंबई महानगरपालिकेने ( ) संयुक्त मोहीम हाती घेत अशा विक्रेत्यांवर कडक कारवाई सुरू केली आहे. केवळ मुंबईतच नाही तर राज्यातील अनेक शहरात वृत्तपत्रात खाद्यपदार्थ विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई सुरू झाली आहे. अन्न व औषध प्रशासनाने वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ विकणाऱ्या विक्रेत्यांवर सुरू केलेली ही धडाकेबाज कारवाई स्वागतार्ह आहे. या धडाकेबाज कारवाईचे जनतेतून स्वागतच होत असून या करवाईसाठी तुकाराम मुंढे साहेबांचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांचे जाहिर आभारही मानले जात आहे. ही कारवाई सुरू झाल्यानंतर अनेकांना असे वाटले की वर्तमानपत्राच्या कागदात खाद्यपदार्थ देऊ नये हा तुकाराम मुंढे साहेबांचा आदेश आहे प्रत्यक्षात त्यांनी आधीपासून असलेल्या कायद्याची प्रभावी आणि कडक अंमलबजावणी केली आहे. वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ देण्यावर कायद्याने बंदी २०१९ पासूनच आहे मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नव्हती. तुकाराम मुंढे साहेबांनी त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली ही कारवाई पुढे पण अशीच सुरू राहिली पाहिजे कारण खाद्यपदार्थ विक्रेते सर्रासपणे वर्तमानपत्राच्या कागदात भजे, वडापाव, पोहे, उपमा, इडली, डोसा, उडीदवडा, कच्छी दाबेली यासारखे गरम खाद्यपदार्थ बांधून देतात. भेळ विक्रेतेही वर्तमानपत्राच्या कागदातच भेळ बांधून देतात. पथारीवरील छोटे व्यावसायिकच नव्हे तर छोटे छोटे हॉटेल्स, बेकरी व्यावसायिक, स्नॅक सेंटर, स्वीट होम चालक, फेरीवाले खाद्यपदार्थ बांधण्यासाठी वर्तमानपत्राचा कागद सर्रासपणे वापरतात. टिश्यू पेपर किंवा किचन रोल्सच्या तुलनेत हा पर्याय स्वस्त असल्याने निवडला जातो मात्र ; असे करणे आरोग्यास हानिकारक आहे. वर्तमानपत्राचा किंवा मासिकाचा कागद अधिक आकर्षित करण्यासाठी डायआयब्युटाइल फटालेट आणि डायईन आयसोब्यूटाईल या केमिकलचा वापर वृत्तपत्र छपाईसाठी केला जातो. हे केमिकल आरोग्यासाठी अतिशय घातक असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

याशिवाय वर्तमानपत्राच्या छपाईसाठी वापरल्या जाणाऱ्या शाईमध्ये शिसे, कॅडियम आणि झिंक यासारखे जड धातू असतात जेंव्हा गरम किंवा तेलकट पदार्थ ( कसे भजे, वडापाव, पोहे ) कागदावर ठेवले जातात तेंव्हा ती शाई वितळून अन्नात मिसळते. शाई मधील रासायनिक घटक पोटात गेल्यास पोटाचे विकार, यकृताचे आजार, किडनी निकामी होणे आणि दीर्घकाळात कॅन्सर सारखे गंभीर आजार होऊ शकतात. अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी मध्यंतरी एक प्रयोग केला. या प्रयोगात त्यांनी वेष्टन म्हणून वापरल्या जाणाऱ्या कागदाचे पृथक्करण करण्याची पद्धत शोधून काढली. यानंतर या शास्त्रज्ञांनी विविध हॉटेल्स, उपहारगृहे यात फास्टफूड बांधून दिल्या जाणाऱ्या वेष्टनाच्या कागदाचे तसेच पदार्थांचे विश्लेषण केले तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की ज्या वेष्टनाच्या कागदावर छपाई केली आहे अशा वर्तमानपत्राचा आणि मासिकाचा कागद वापरलेले खाद्यपदार्थ ज्यांनी सेवन केले आहे त्या लोकांच्या पोटात अनेक घातक घटक गेले आहेत हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले. हे घातक घटक शरीरात गेल्यावर ते कोणत्या अवयवात जाऊन कोणत्या प्रकारचे दोष निर्माण करतात यावरही त्यांनी संशोधन केले तेंव्हा त्यांच्या असे लक्षात आले की घातक घटक ( केमिकल ) किडनी, यकृत, जठर आणि फुफ्फुसावर दुष्परिणाम करतात. ब्रेडला आवरण म्हणून वापरला जाणारा कागद हा याबाबतीत सर्वाधिक घातक दुष्परिणाम घडणारा असल्याचे शास्त्रज्ञांच्या लक्षात आले असून त्याचे प्रमाण ५६ टक्के आहे तर बर्गर, सँडविच बांधून दिलेल्या कागदात ३२ टक्के घातक घटक असल्याचे त्यांनी सिद्ध करून दाखवले.

वर्तमानपत्राच्या कागदामध्ये देखील मोठ्या प्रमाणात घातक घटक असतात. हे घातक घटक पोटात गेल्याने अनेक गंभीर आजार होऊ शकतात म्हणूनच नागरिकांनी वर्तमानपत्रात बांधून दिलेले खाद्यपदार्थ खाणे टाळले पाहिजे. विक्रेत्यांनीही खाद्यपदार्थ वर्तमानपत्राच्या कागदात बांधून देण्याऐवजी टिश्यू पेपर किंवा किचन रोल्सचा वापर करावा. ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाने दिलेला हा आदेश अतिशय योग्य असून त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# ॲड. धन्नावत यांच्या पाठपुराव्याला यश: धोकादायक उड्डाणपुलाच्या सुरक्षा भिंतीचे काम अखेर सुरू

**जालना - प्रतिनिधी**



शहरातील नूतन वसाहत परिसरातील धोकादायक उड्डाणपुलाच्या तुटलेल्या सुरक्षा भिंतीच्या दुरुस्तीचे काम अखेर महानगरपालिका प्रशासनाने सुरू केले आहे. सामाजिक कार्यकर्ते ॲड. महेश धन्नावत यांनी या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना आणि प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तांना यश आले असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

मागील अनेक महिन्यांपासून नूतन वसाहत भागातील उड्डाणपुलाची संरक्षक भिंत अत्यंत जीर्ण आणि धोकादायक अवस्थेत होती. या भिंतीचे अनेक भाग तुटून पडल्यामुळे येथून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसाठी आणि पादचाऱ्यांसाठी मोठा धोका निर्माण झाला होता. विशेष म्हणजे, महानगरपालिका प्रशासनाने काही काळापूर्वी या पुलाचे सुशोभीकरण करण्याच्या नावाखाली केवळ रंगरंगोटी केली होती, परंतु मूळ धोकादायक तुटलेल्या भिंतीच्या दुरुस्तीकडे पूर्णपणे कानाडोळा केला होता. हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करून केवळ वरवरची मलमपट्टी करण्यासारखा होता. या गंभीर प्रकाराची दखल घेत ॲड. महेश धन्नावत यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे लेखी पत्रव्यवहार करून तक्रार दाखल केली. या धोकादायक भिंतीमुळे मोठा अपघात होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली होती आणि तात्काळ दुरुस्तीची मागणी केली होती. यासोबतच, स्थानिक प्रसारमाध्यमांनीही या समस्येचे गांभीर्य ओळखून वृत्त प्रकाशित केले, ज्यामुळे प्रशासनावर दबाव वाढला. या एकत्रित प्रयत्नांमुळे अखेर प्रशासनाला जाग आली आणि त्यांनी भिंतीच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले आहे. एका बाजूला या कामामुळे समाधान व्यक्त होत असले तरी, दुसरीकडे शहरातील आणखी एका महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या ठिकाणी अशीच धोकादायक परिस्थिती कायम आहे. अंबड-औरंगाबाद महामार्गावर मोतीबाग जवळ असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाची संरक्षक भिंतही अत्यंत नादुरुस्त झाली आहे. या पुलावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा असते. आश्चर्याची बाब म्हणजे, शहराचे जिल्हाधिकारी, अनेक राजकीय नेते आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी याच मार्गाचा नियमितपणे वापर करतात, तरीही या गंभीर समस्येकडे त्यांचे लक्ष गेलेले नाही.

प्रशासनाने (पान २ वर)

# महिलांना आरक्षण न दिल्यास हाहाकार माजेल : माजी आ.लहुजी कानडे

## अहिल्यादेवी होळकर व्याख्यानमालेचा समारोप

**दत्ता देशमुख**

पश्चिम बंगालच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारने महिला आरक्षणाच्या नावाखाली मतदार संघ फेररचना (डी- लिमिटेशन्स) चे बिल आणले होते. जागृत विरोधकांमुळे ते फेटाळून लावण्यात आले असले तरी महिला आरक्षणाचा कायदा करून आगामी निवडणुका या महिला आरक्षणाशिवाय घेणे अशक्य आहे. महिलांना आरक्षण न दिल्यास हाहाकार माजेल. असे भाकीत ज्येष्ठ विचारवंत, माजी आमदार लहुजी कानडे यांनी व्यक्त केले.



तथापि सन २०२३ साली लोकसभा आणि राज्यसभेत महिला आरक्षणाचे विधेयक मंजूर करून घेतल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन केले पाहिजेत असे सूचक विधानही कानडे यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बहुजन व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी “ अहिल्यादेवी होळकर यांचे महिला विषयक धोरण, सद्यस्थितीत (पान २ वर)

# हैद्राबाद येथून ‘रयत टीम’ नॅशनल लेव्हल प्रशिक्षण घेऊन गावात दाखल

## हैदराबाद येथील इन्स्टिट्यूट कडून मिळालेल्या माहितीचा उपयोग समृद्ध शेतकऱ्यांसाठी करणार - अविनाश राठोड

**मंठा - योगेश राठोड**

मंठा. तालुक्यातील नायगाव,दहिफळ आणि गारटेकी येथील संयुक्त शेतकरी अविनाश राठोड,पवन खंदारे,गोविंद सानप ई.सदस्यांची हैदराबाद येथे नॅशनल लेवल जैविक आणि नैसर्गिक खताचा शेतीत वापर या संदर्भात प्रशिक्षणासाठी निवड झाली होती.महाराष्ट्र शासनाच्या जालना कृषी विभागाच्या मंठा आत्मा विभागा अंतर्गत यांची हैदराबाद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ प्लांट हेल्थ मॅनेजमेंट येथे तीन दिवसीय सखोल माहिती घेऊन प्रशिक्षण पूर्ण करून शेतकरी




वर्ग परत गावात वापस आलेला आहे.जैविक औषधाचा वापर करून शेतातील कीटक, आळ्याचे व्यवस्थापन, आपल्याच घरी ट्रायकोझर्मा, मायकोरायझा कशा प्रकारे बनवायचे याबद्दल माहिती व प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.आणि नैसर्गिक शेतीमध्ये दशपर्णी अर्क, ब्रह्मास्त्र, अग्निअस्त्र, लिंबोळी इतर अर्कचा शेतीच्या सुपीकता व उत्पन्न वाढीसाठी कसा वापर करावा यासाठी सखोल शास्त्रशुद्ध पद्धतीने सखोल माहिती व मार्गदर्शन मिळाले असल्याचे रयत गटाचे अध्यक्ष अविनाश (पान २ वर)

# मानवाधिकार लढ्याने मिळवलेली शौचालये बनली रोगराईची केंद्रे; प्रशासन आणि सामाजिक संस्थांचे दुर्लक्ष

**जालना - प्रतिनिधी**

ॲड. अश्विनी महेश धन्नावत यांच्या महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगातील यशस्वी लढ्यानंतर शहरात उभारण्यात आलेली सार्वजनिक शौचालये, प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे आज रोगराई आणि दुर्गंधीची केंद्रे बनली आहेत. नागरिकांच्या आरोग्याचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न सोडवण्यासाठी मिळवलेली ही सुविधा आता त्यांच्यासाठीच एक गंभीर धोका ठरत आहे. विशेष म्हणजे, शहरात कार्यरत असलेल्या रोटरी आणि लायन्स क्लबसारख्या सामाजिक संस्थांनी देखील या समस्येकडे पाठ फिरवल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. ॲड. अश्विनी धन्नावत यांनी काही वर्षांपूर्वी शहरातील सार्वजनिक शौचालयांच्या दुरवस्थेचा आणि अभावाचा मुद्दा उचलून धरत आयोगाकडे दाद मागितली होती. त्यांच्या या लढ्यामुळे प्रशासनाला शहरात आवश्यक ठिकाणी शौचालये बांधण्यास भाग पडले. मात्र, ही शौचालये बांधून केवळ काही दिवसच त्यांची निगा राखली गेली. आज या शौचालयांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. तुटलेले दरवाजे, तुंबलेल्या मलवाहिन्या, पाण्याची अनुपलब्धता आणि सर्वत्र पसरलेली घाण यामुळे नागरिक त्यांचा वापर करणे टाळत आहेत. अनेक शौचालयांना कुलूप लावलेले असते आणि ते केवळ तपासणीच्या वेळी उघडले जातात, ज्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

महिलांच्या शौचालयांची स्थिती तर आणखीनच गंभीर आहे. अनेक ठिकाणी शौचालयांना दरवाजेच नाहीत, ज्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा आणि गोपनीयतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाणी आणि स्वच्छतेची कोणतीही सोय नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही शौचालये आता संसर्गजन्य रोगांना आमंत्रण देणारी ठिकाणे बनली आहेत. शहराच्या विकासात आणि सामाजिक कार्यात नेहमीच पुढे असणाऱ्या रोटरी आणि लायन्स क्लबसारख्या प्रतिष्ठित संस्थांनी या गंभीर प्रश्नाकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले आहे. अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घेणाऱ्या या संस्थांना सार्वजनिक शौचालयांची देखभाल आणि स्वच्छता यांसारख्या मूलभूत गरजेच्या विषयात रस नसल्याचे चित्र आहे.

या समस्येवर एक व्यवहार्य तोडगा म्हणून पे अँड युज तत्वावर शौचालये चालवण्याचा पर्याय पुढे येत आहे. नाममात्र शुल्क आकारून जर या शौचालयांची नियमित स्वच्छता आणि देखभाल केली गेली, तर ती वापरण्यायोग्य राहतील आणि प्रशासनावरील आर्थिक भारही कमी होईल. या मॉडेलमुळे स्वच्छतेसाठी आवश्यक कर्मचारी आणि संसाधने उपलब्ध करणे शक्य होईल. मात्र, यासाठी प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे.

या सर्व प्रकारात आणखी एक गंभीर बाब समोर आली आहे. प्रशासनाने काही ठिकाणी सार्वजनिक शौचालये बांधताना खासगी मालमत्तांचा वापर केला आहे आणि त्यासाठी संबंधित मालकांना कोणताही मोबदला दिलेला नाही. परवानगीशिवाय खासगी जागेवर बांधकाम करणे आणि नुकसान भरपाई न देणे, हा कायद्याचा भंग असून यामुळे बाधित नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे नवीन कायदेशीर वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

सार्वजनिक स्वच्छता आणि नागरिकांना स्वच्छ शौचालयांचा अधिकार हा त्यांच्या सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचा भाग आहे, असे सर्वोच्च आणि उच्च (पान २ वर)

# देऊळगाव राजा वनपरिक्षेत्रात दोन नीलगायींना जीवदान; वनविभाग व युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया यांची यशस्वी बचाव मोहीम

**दत्ता देशमुख**

देऊळगाव राजा तालुक्यातील धोत्रा नांदई परिसरातील एका पाण्याच्या तळ्याजवळ असलेल्या चिखलयुक्त खड्ड्यात दोन नीलगायी तब्बल दोन दिवसांपासून अडकून पडल्या होत्या. चिखलात खोलवर रुतल्यामुळे त्यांना अनेक प्रयत्न करूनही बाहेर पडता येत नव्हते.

दिनांक ६ जून २०२६ रोजी स्थानिक नागरिकांनी या घटनेची माहिती वनविभागाला दिली. माहिती मिळताच देऊळगाव राजा वनपरिक्षेत्राचे उमेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ मदतकार्य सुरू करण्यात आले. वन्यजीव रक्षक वैभव लाखोले तसेच युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियाच्या रेस्क्यू टीमला घटनास्थळी पाठविण्यात



आले.

रेस्क्यू टीम घटनास्थळी पोहोचल्यावर दोन नीलगायींपैकी एका नीलगायीच्या तोंडातून रक्तस्त्राव होत असल्याचे दिसून आले. स्थानिक नागरिकांकडून माहिती घेतल्यानंतर, चिखलातून बाहेर पडण्यासाठी सतत प्रयत्न करताना तिला दुखापत झाल्याचे समजले.

वनविभाग आणि युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडियाच्या रेस्क्यू टीमकडे अत्याधुनिक बचाव साहित्य उपलब्ध नसतानाही त्यांनी धाडसाने बचाव मोहीम हाती घेतली. नीलगायी मोठ्या प्रमाणात चिखलात रुतल्यामुळे त्यांना बाहेर काढणे अत्यंत कठीण ठरत होते. मात्र टीमच्या अथक प्रयत्नांमुळे अनेक तासांच्या परिश्रमानंतर दोन्ही नीलगायींना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले.

बचाव कार्यादरम्यान नीलगायींना कोणतीही अतिरिक्त दुखापत होणार नाही याची विशेष काळजी घेण्यात आली. यशस्वी रेस्क्यूनंतर दोन्ही (पान २ वर)

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.१ जुन २०२६ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगाबाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅपीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना, खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था, भांडवल उभारणी, मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी कांतिकराव दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१ जुन २०२६ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन कांतिकराव दांडगे, मिटकॉन, जालना यांनी केले आहे.

# विमा नाकारणे विमा कंपनीला, तर चुकीचा वैद्यकीय शेरा रुग्णालयाला भोवला

**जालना - प्रतिनिधी**

रुग्णाच्या वैद्यकीय नोंदीमध्ये नमूद केलेल्या एका तात्पुरत्या निरीक्षणाच्या आधारावर मेडिक्लेम नाकारणे एचडीएफसी एर्गो जनरल इन्शुरन्स कंपनीला चांगलेच महागात पडले आहे. कुर्नूल जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने विमा कंपनीला सेवेतील त्रुटीसाठी दोषी ठरवले आहे, तसेच कोणत्याही योग्य पडताळणीशिवाय संवेदनशील वैद्यकीय निरीक्षण नोंदवल्याबद्दल कॉन्टिनेंटल रुग्णालयालाही जबाबदार धरले आहे. या महत्त्वपूर्ण निकालामुळे विमा कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आणि रुग्णालयांच्या निष्काळजीपणाला मोठा चाप बसला आहे.या प्रकरणात, तक्रारदार अटल हर्षवर्धन रेड्डी यांनी त्यांचे वडील, कै. अतला विजया भास्कर रेड्डी यांच्या वैद्यकीय खर्चासाठी एचडीएफसी एर्गो कडून ‘एनर्जी सिल्व्हर इन्शुरन्स पॉलिसी’ घेतली होती. २५ जून २०२४ रोजी, तक्रारदाराच्या आई-वडिलांवर काही नातेवाईक आणि अज्ञात व्यक्तींनी हल्ला केला, ज्यात त्यांच्या आईचा जागीच मृत्यू झाला आणि वडिलांना गंभीर दुखापत झाली. वडिलांवर हैदराबाद येथील कॉन्टिनेंटल रुग्णालयात उपचार सुरू होते, ज्यासाठी १० लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च आला.जेव्हा तक्रारदाराने कॅशलेस विम्यासाठी दावा दाखल केला, तेव्हा रुग्णालयाच्या डिस्चार्ज समरीमध्ये नमूद केलेल्या ‘अल्कोहोल विथड्रॉवल सायकोसिस’ (मद्यपान सोडल्यामुळे होणारी मानसिक स्थिती) या उल्लेखाच्या आधारे एचडीएफसी एर्गो कंपनीने आक्षेप घेतला. तक्रारदाराने वडिलांच्या आयुष्यात मद्यपानाचा कोणताही इतिहास नसल्याचे स्पष्ट केले आणि उपचार करणाऱ्या डॉक्टर व रुग्णालयाकडून हे निरीक्षण केवळ एक तात्पुरते निदान होते, हे निश्चित वैद्यकीय स्थिती नसल्याचे स्पष्टीकरण पत्र सादर केले. यानंतर कॉन्टिनेंटल रुग्णालयाने सुधारित डिस्चार्ज समरी जारी करून तो उल्लेख काढून टाकला.ही सर्व स्पष्टीकरणे मिळूनही, विमा कंपनीने फसवणूक आणि बनावटगिरीचा आरोप करत दावा फेटाळला आणि पॉलिसी रद्द केली. या अन्यायाविरोधात तक्रारदाराने विमा कंपनी आणि रुग्णालय या दोघांविरुद्ध ग्राहक आयोगाकडे धाव घेतली. आयोगाने सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. विमा कंपनीने फसवणुकीचा मुद्दा उचलून धरला, तर रुग्णालयाने सांगितले की ते केवळ रुग्णाच्या लक्षणांवर आधारित एक तात्पुरते निदान होते, जे नंतर मागे घेण्यात आले.आयोगाने आपल्या निरीक्षणात नमूद केले की, विमा पॉलिसी वैध असताना आणि हल्ल्यामुळे झालेल्या दुखापती पॉलिसी अंतर्गत येत असताना, केवळ एका तात्पुरत्या आणि नंतर सुधारलेल्या वैद्यकीय उल्लेखाच्या आधारावर दावा नाकारणे पूर्णपणे चुकीचे आहे. आयोगाने एचडीएफसी एर्गोला फसवणुकीचा किंवा तथ्य लपवल्याचा कोणताही ठोस पुरावा सादर करता आला नाही, त्यामुळे दावा नाकारणे आणि पॉलिसी रद्द करणे ही सेवेतील त्रुटी आणि अनुचित व्यापार प्रथा आहे, असे स्पष्ट केले. तसेच, कॉन्टिनेंटल रुग्णालयाने इतके संवेदनशील निरीक्षण (पान २ वर)

# अशोका पब्लिक स्कूल, मंठा येथे स्वराज्याची परिपूर्ती शिवराज्याभिषेक दिन साजरा



**मंठा - प्रतिनिधी**

अशोक भाऊ चव्हाण () सेवा संस्थेच्या अशोका पब्लिक स्कूल, मंठा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन श्री संजयकुमार चव्हाण सर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मच्छिंद्र लिंभोरे यांची होती. कार्यक्रमात शिवाजी महाराजांच्या कार्याचा, शौर्याचा आणि स्वराज्य स्थापनेतील योगदानाचा गौरव करण्यात आला. उपस्थितांना शिवराज्याभिषेक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व सांगण्यात आले.

६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर झालेल्या राज्याभिषेकामुळे हिंदवी स्वराज्याला अधिकृत मान्यता मिळाली. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सविता चव्हाण, शितल कुटारे ,अश्विनी चंदेल, प्रणिता दळवी ,ज्योती शहाणे आदींनी परिश्रम घेतले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.